MHLA160009132022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११८/२०२२**
**शासन वि. ज्ञानोबा**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२-अ च्या गुन्ह्याकरिता दि.१२/०८/२०२२ रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. आरोपी क्र.३ ते ५ यांना वॉरंटची व आरोपी क्र.१, २ व ६ यांना समन्सची बजावणी झालेली नाही. पोलिसांनी आरोपी मिळून न आल्याने समन्स व वॉरंट विनातामील परत केलेले आहेत. प्रकरण फार जुने आहे. भविष्यामध्ये सुध्दा सदर समन्सची व वॉरंटची बजावणी होऊन आरोपी हजर होण्याची शक्यता दिसून येत नाही. पोलिसांनी व अभियोग पक्षाने आरोपीचे समन्स व वॉरंट बजावण्यास कसूर केला. त्यामुळे सदर प्रकरण गुणवत्तेवर सुध्दा अभियोग पक्षाच्या बाजुने निकाली काढता येणार नाही. सदर प्रकरण विनाकारण व विना प्रगती प्रलंबित ठेवणे अनुचित ठरेल. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. अपील कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मुद्देमाल म्हणजे जुगाराचे साहित्य नष्ट करावेत व जप्त रक्कम ही शासन जमा करावी.

०४. अपील कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मोटरसायकलचा सुपुर्तनामा रद्द करण्यात येतो आणि अंतरिम ताबा कायम करण्यात येतो.

०५. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:32:33 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – १३-०३-२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**